NAGPURSTUDY.COM



# Bachelor of Science [B.Sc./B.C.A./B.Sc.(I.T.)] Semester—I (C.B.S.) Examination

## MARATHI

## (Compulsory)

## Paper—II

वेळ — तीन तास] [एकूण गुण — 60

सूचना : (1) सुवाच्य अक्षरे, मुद्देसूद उत्तरे आणि शुद्धलेखन अपेक्षित.

(2) सर्व प्रश्न अनिवार्य.

1. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा (200 शब्दात) : 12

(1) स्त्रीभृणहत्या : एक सामाजिक समस्या

(2) पर्यावरण रक्षण काळाची गरज.

2. खालील प्रश्नाचे उत्तर लिहा (200 शब्दात) : 12

म. गांधीना स्टीमरमध्ये प्रवास करताना कोणते अनुभव आले ? ते स्पष्ट करा.

किंवा

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत देश कशा प्रकारे विज्ञानोपासना करीत आहे ?

3. खालील प्रश्नाचे उत्तर लिहा (200 शब्दात) : 12

संत ज्ञानेश्वरांनी विश्वात्मक देवाला कोणते पसायदान मागितले ?

किंवा

'कशाला पंढरी जातो ?' या कवितेचे रसग्रहण करा.



rtmnuonline.com Scanned by CamScanner

NagpurStudy.com

4. खालील प्रश्नाचे उत्तर लिहा :

(अ) ब्राह्मण व मारवाडी सावकार शेतकऱ्यांना कशा प्रकारे लुबाडतात ? 3

किंवा

कोणत्या प्रकारचे शास्त्रीय ज्ञान आपण हस्तगत केले पाहिजे ?

(ब) संत तुकारामांच्या अभंगातून व्यक्त झालेला पर्यावरणविषयक विचार स्पष्ट करा. 3

किंवा

कवीला वगळून माणसाच्या जगण्याला कोणतेही मोल मिळणार नाही असे केशवसुतांना का वाटते ?

(क) खालील म्हणीचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा : 3

'चोराच्या मनात चांदणे'.

(ड) खालील शब्द शुद्ध करून पुन्हा लिहा : 3

(i) परकिय

(ii) सामाजीक

(iii) आशिरवाद

(iv) भाशा

(v) भुमीका

(vi) उजवल.



rtmnuonline.com Scanned by CamScanner

NAGPURSTUDY.COM

5. (अ) खालील उताऱ्याचा सारांश तुमच्या शब्दात लिहा : 4

दु:खे येतात ती आपली कसोटी पाहण्यासाठीच येतात. त्या वेळी न डगमगणे हाय खरा पुरुषार्थ. भट्टीतून तावून सुलाखून निघाल्याखेरीज सोन्याला तेज़ चढत नाही. पैलू पाडलयाशिवाय हिऱ्याला सुद्धा किंमत येत नाही. आपणावर कोसळणारी दु:खे ही अशीच आपल्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडण्यासाठी निर्माण झाली आहेत असे आपण का समजू नये ? शिवाय जगात दु:खे आहेत म्हणून सुखाची किंमत आपणांस कळते ना ? जगात अंधारी रात्र आहे म्हणूनच चंद्राला महत्व. त्याचप्रमाणे दु:ख आहे म्हणूनच जगात सुखाचे महत्त्व आहे तुम्हांला नाही वाटत ? नुसते गोड जेवण जेवण्याचा तुम्ही कधी प्रयत्न केला आहे काय ? नुसत्या गोडाने तोंडाला कशी मिठी बसते, हे तुम्हांला माहीत आहेच. केवळ सुखच जगात असते तर अशीच आपली स्थिती झाली नसती का ? शिवाय दु:खानंतर सुख आले म्हणजे त्याची लज्जत काही न्यारीच असते असा अनुभव कुणाला नाही ? परीक्षेसाठी कष्ट केल्यानंतरच निकालाच्या आनंदाची खरी गोडी आपणांस कळते असे जर आहे तर वर्तमानकाळच्या दु:खाबद्दल आपण कुरकूर का करावी ? आणि दु:ख पर्वताएवढे असे का मानावे ?

(ब) सहलीला जाण्यासाठी बस आगाराला पत्र लिहा. 4



rtmnuonline.com Scanned by CamScanner

NAGPURSTUDY.COM

(क) खालील इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 4

Man usually becomes a slave of his circumstances. Whenever he faces hardships or agony, he reels under its effect and develops a tendency to give up. If his circumstances make him weep, he weeps, if his circumstances make him laugh, he laughs. Hence, he becomes a slave of time and destiny. A man who wants to dash ahead towards a great life has to learn the art of winning over circumstances.



rtmnuonline.com Scanned by CamScanner